## निशानी क्र. १३७ वर आदेश

प्रतिवादी क्र. ९ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन 'कैफियत' दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत स्विकारण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी/ अर्जदाराचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. ९ यांचे विरुध्द दि.२९.०३.२०२३ रोजी विना कैफियतीचा आदेश झालेला असून त्यांना जवाबदावा दाखल करणेस ५ महिने २२ दिवसांचा विलंब झालेला आहे. तो विलंब त्यांनी जाणुनबुजून केलेला नाही. प्रतिवादी क्र. ९ हा सोने-चांदीचा व्यापार करतो. त्यामुळे तो नेहमी फिरतीवर असतो. त्यामुळे तो प्रकरणात लेखी कैफियत दाखल करणे कामी महत्वाची कागदपत्रे वेळेत जमा करू शकला नसल्यामुळे तो मुदतीमध्ये त्यांचा जवाबदावा दाखल करु शकले नाही. प्रकरण स्थावर मिळकतीसंबंधी असल्याने त्यामध्ये त्यांचे हक्क संबंध गुंतलेले आहेत. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, सदर अर्ज.

३. वादीच्या विद्वान वकीलांनी अर्जाचे पाठीमागील पानावर आपले म्हणणे दाखल करून अर्जातील कारण संयुक्तीक नसल्याने जास्तीत जास्त दंड आकारून अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. उभय पक्षांच्या विद्धवान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. सदरील दावा वाटणी करून वेगळा ताबा मिळणेबाबत दाखल करण्यात आलेला आहे. समन्सची बजावणी झाल्यानंतर तीन महिन्याच्या आत प्रतिवादीला कैफियत दाखल करणे अपेक्षित होते. परंतु तसे न झाल्यामुळे प्रतिवादी क्र. ९ यांच्या विरुध्द दि. २९.०३.२०२३ रोजी विना कैफियत आदेश पारीत करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र.९ यांनी कैफियत दाखल करण्यासाठी ५ महिने २२ दिवसाचा विलंब केलेला आहे. परंतु दाव्याचा योग्य रितीने न्यायनिवाडा

होण्याकरिता प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करणे गरजेचे वाटते. कारण असे झाल्यास त्यांची लेखी कैफियत त्यांना दाखल करता येईल व तो दावा निकाली लावण्याकरिता गरजेचे आहे.

६. अशा परिस्थितीत, प्रतिवादी क्र. ९ यांना झालेला विलंब हा पैशाच्या स्वरुपात भरुन काढण्याजोगा आहे. म्हणुन प्रतिवादी क्र. ९ यांना झालेल्या विलंबापोटी खर्चाचा आदेश करणे मला योग्य वाटते. म्हणुन न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना झालेला विलंब माफ करुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ९ यांना लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब रक्कम रुपये २००/- वादीस खर्च म्हणुन देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

३. प्रतिवादी क्र. ९ यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २००/- न्यायालयात जमा केल्यास ती वादीस देण्यात यावी.

४. प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. ९ यांनी सोसावा.

Digitally signed by PRAVIN VISHWAS PATIL
Date: 2023.09.05 12:13:32 +0530

दिनांक ०४.०९.२०२३ ( प्रविण व्ही. पाटील)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 04.09.2023

Transcribed on : 04.09.2023

Checked & signed on : 04.09.2023

Sd/-

(S.Y. Gore),

Stenographer Grade-3,